## दिनांक १३/०८/२०१५ रोजी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या PIL १७६/२०१२ अन्वये गठित अभ्यासगटाच्या बैठकीचे इतिवृत्त

दिनांक ५ जून मध्ये गोदावरी व इतर नद्या स्वच्छ करण्यासाठी स्वच्छता मोहिम अभियान तसेच १ जुलै रोजी नाशिक मध्ये ६.५० लाख वृक्षरोपन करुन पर्यावरण विषयक जनजागृती विषयक उत्कृष्ट काम सर्व विभागाने केले आहे. गोदावरी नदीचे पुर्नजीवन करणेकामी नाशिक महागनगर पालिकेने ५००० स्वयंसेवक प्रशिक्षित केलेले आहे. या वर्षीचा सिंहस्थ कुंभमेळा ख-या अर्थाने हरित कुंभ म्हणून साजरा करणार आहोता. सदर हरित कुंभाच्या कालावधीमध्ये खालील तीन गोष्टीवर/ बाबींवर सर्व विभागाने मोठ्या प्रमाणावर काम करावे.

१) सिंहस्थ कुंभाच्या कालावधीत उघड्यावर स्वच्छास बसण्यास प्रतिबंध
२) घन कचरा व्यवस्थापन
३) प्लॅस्टिक मुक्त कुंभ

बैठकीस सोबतच्या यादीप्रमाणे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत झालेल्या चर्चा व त्या अनुषंगाने घेण्यात आलेले निर्णय खालील प्रमाणे

| अ.क्र. | बैठकीत झालेली चर्चा व घेण्यात आलेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|
| १ | नाशिक शहरामधील शाळेतील विद्यार्थ्यांकडून कापडी पिशव्या तयार करुन व प्रत्यके विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील एका कुंटुबाला एक कापडी पिशवी भेट देऊन पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणे याबाबत अहवाल सादर करावा.<br>आपल्या विभागामार्फत ६०,००० कापडी पिशव्याचे वाटप करणेत आले आहे याबाबत अहवाल हरित कुंभ कक्षाकडे पाठविण्यांत यावा. | उपसंचालक (शिक्षण विभाग)<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>प्रादेशिक अधिकारी शिक्षण मंडळ (मनपा) |
| २ | महानगरपालिका क्षेत्रामध्ये सर्व विभागाच्या विभागीय अधिकारी यांनी येत्या कुंभपर्वात त्यांच्या विभागात असलेल्या खुल्या जागा / नाले व रस्त्याच्या कडेला कोणीही उघड्या जागेवर स्वच्छास बसणार नाही, घनकचरा व्यवस्थापन व प्लॅस्टीक मुक्त हरित कुंभ याबाबत कार्यवाही करुन आरोग्य विषयक जनजागृती मोठ्या प्रमाणात करणे. | मनपा क्षेत्रातील सर्व विभागीय अधिकारी |
| ३ | नाशिक व त्र्यंबकेश्वर शहर प्लॅस्टीक कचरा मुक्त करणे- विक्रीकर विभाग, उपनियंत्रक वैध मापन शास्त्र विभाग, आरोग्य वैद्यकिंय अधिकारी मनपा व पोलीस विभाग यांनी स्वतंत्र पथके नेमून ५० मायक्रोनच्या खाली असलेल्या प्लॅस्टीक पिशव्याचे व्यापारी, फळ भाज्या, अन्नधान्य औषध खाद्य पदार्थ विक्रेते त्यांच्या कडून जप्त करुन त्यांच्यावर कडक कार्यवाही करुन संबंधित विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्याबाबत कारवाई करावी. | १) सह आयुक्त, विक्रीकर विभाग, २) आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मनपा ३) उपनियंत्रक वैध मापन शास्त्र विभाग व ४) पोलीस विभाग ५) मुख्यधिकारी, त्र्य.न.पा. |
| ४ | प्लॅस्टीक कचरा मुक्त शहर, पर्यावरण स्वच्छता व हरित कुंभ विषयक माहिती देणा-या जिंगल्स, slide show, लघु चित्रपट इत्यादी तयार करणे व दुरदर्शन, आकाशवाणी वृत्तपत्रे, सिनेमागृहात व केबलवर जाहिराती देणे व व्यापक प्रसिध्दी देणे. | करमणूक कर अधिकारी, नाशिक, व जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक |
| ५ | कुंभ पर्वणी काळात चहाचे प्लॅस्टीकचे कप व प्लॅस्टीक प्लेट याचा वापर मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असल्याने त्यावर योग्य ती कारवाई करावी. तसेच पर्वणी काळात मोठ्या प्रमाणात खाद्य पदार्थ विक्री होणार असल्याने यातून निर्माण होणार कचरा खाद्य पदार्थ विक्रेत्याने स्वत: गोळा करुन तो कचरा महानगर पालिकेच्या कर्मचा-यांकडे देणे यासाठी महानगरपालिकेने पुरेशे कचराकुंड्याची व्यवस्था करावी. शंभर मिटर परिसरात एक याप्रमाणे संपूर्ण शहरात २५०० कचरा कुंड्या ठेवण्याची व्यवस्था करावी यासाठी १२०० स्वंयसेवक तयार करावे. | आरोग्य वैद्यकिय अधिकारी, महानगरपालिका, नाशिक<br>सह आयुक्त विक्री कर विभाग, मुख्याधिकारी, त्र्यंबक नगर पालिका |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रादेशिक परिवहण अधिकारी यांनी रिक्षा, ट्रक, खाजगी बसेस इत्यादींवर पर्यावरण संरक्षण व जनजागृतीबाबत स्टिकर्स, पेंटीग व इत्यादीबाबत कार्यवाही करुन अहवाल सादर करावा. | प्रादेशिक परिवहन अधिकारी, |
| ७ | प्लॅस्टीक मुक्तीसाठी महानगर पालिका व पोलिस विभागाने आवश्यकतेनुसार भारतीय दंड संहिता कलम १३३ व १४४ खाली प्रोहिबेटरी आदेश काढणे. | १) आयुक्त, महानगरपालिका, २) पोलीस विभाग ५) मुख्यधिकारी, त्र्य.न.पा. |
| ८ | सर्व विभागांनी हरित कुंभ कृति आराखड्याप्रमाणे अंमलबजावणीचा अनुपालन अहवाल दर महिनय्ला ५ तारखेपर्यंत सिंहस्थ कुंभमेळा कक्षस जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचे Simhastha२०१५@gmail.com व उप आयुक्त (हरित कुंभ कक्ष) महानगर पालिका, नाशिक यांचेकडेस haritkumbhnsk१५@gmail.com या E-mail वर पाठवावा. | सर्व विभाग |

विभागीय आयुक्त, नाशिक